# मराठा आरक्षणाबाबत मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य किल्लारीकर यांनी केलेल्या आरोपांबाबत आज विधानभवन, नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस…

By Devendra Fadnavis on December 12th, 2023




मुंबई, 12 डिसेंबर

मराठा आरक्षणाबाबत मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य किल्लारीकर यांनी केलेल्या आरोपांबाबत आज विधानभवन, नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली प्रतिक्रिया :

महाविकास आघाडी काळात राज्य मागासवर्ग आयोग तयार झाला, तेव्हा तिन्ही राजकीय पक्षांचे कार्यकर्ते त्यात सदस्य झाले. आम्ही मागासवर्ग आयोग तयार केला, तेव्हा त्यात अभ्यासक घेतले होते. महाविकास आघाडी सरकारने कार्यकर्त्यांचा त्यात भरणा केला. किल्लारीकर यांनी मागासवर्ग आयोगाचा राजीनामा दिल्यावर पहिली भेट शरद पवार यांची घेतली. सर्वेक्षण कसे करावे आणि त्याची पद्धत काय असावी, हे मागासवर्ग आयोग ठरवीत असते. सरकार नाही.

मराठा आरक्षणाचा विषय पूर्णत्वास जाऊ नये आणि तो तसाच खोळंबलेल्या स्थितीत रहावा, अशी ज्या लोकांची इच्छा आहे, तेच यांचे 'पॉलिटिकल मास्टर्स' आहेत. राज्य सरकार मात्र मराठा आरक्षण देण्यावर ठाम आहे, आम्ही त्यासाठी संपूर्ण प्रयत्न करु. खरे तर जो विषय माझ्याकडे नाही, त्यावर त्यांनी बोलणे हे पूर्णपणे राजकारण आहे, त्यामुळे त्यावर प्रतिक्रिया देण्याची मला गरज वाटत नाही.